REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# भारतीय राजकारणातील प्रभावी महिला : इंदिरा गांधी



**प्रा.डॉ. दत्ता मा.कुंचेलवाड**
**राज्यशास्त्र विभाग, नागनाथ कला,वाणिज्य व विज्ञान महाविघालय,औंढा ना जि.हिंगोली.**

## प्रस्तावना :

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राजकारणातील एक प्रभावी महिला म्हणून श्रीमती इंदिरा गांधींचा उल्लेख करावा लागेल. राजकारणात प्रवेश केल्यानंतर संयमी व कमी बोलणाऱ्या महिला म्हणून त्यांना संबोधले जात कालांतराने प्रतिकूल स्थितीतही न डगमगता अगदी खंबीरपणे निर्णय घेऊ लागल्या. विरोधकांनी अनेक डावपेच आखतांना तेवढ्याच तिव्रतेने व मुत्सदीपणे निर्णय घेत विरोधकांना नमवण्यात यश मिळवल्या.त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे १९५५ मध्ये पक्षाच्या वर्कींग कमिटीमध्ये प्रवेश मीळाला. व १९५९ मध्ये कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. पुढे १९६६ मध्ये पंतप्रधान झाल्या मध्यंतरी २८ महिण्यांचे जनता पक्षाचे सरकार वगळता ३१ आक्टोंबर-१९८४ पर्यंत पंतप्रधान म्हणून कार्यरत होत्या. दरम्यानच्या काळात भाषावाद,प्रांतवाद, जातीयवाद, धार्मीक भेद अशा अनेक समस्यांनी भारताला ग्रासले होते. त्यातून त्यांनी मार्ग काढत यशस्वीपणे त्यांनी राजकारण केले. त्यांच्या राजकारणाला राष्ट्रवाद व सामाजीक ऐक्य याची जोड होती. त्यांचेकडून धाडशी निर्णय घेतांना काही गंभीर चुकाही झाल्या. उदा. अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय त्यांच्याविरुद्ध लागला. तरीही त्यांनी राजीनामा दिला नाही. भाषणातून दिलगीरीचा सुर व्यक्त केला, लोकांची मने काबिज केली त्या सत्तेवर असतांना अनेक महत्त्वपुर्ण निर्णय घेतले ज्यात औद्योगिक उत्पादनातील वाढ, बँकाचे राष्ट्रीयकरण, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती, युवककल्याण, आंतरराष्ट्रीय सलोखा व बांगलादेश स्वतंत्रेच्या लढ्याला पाठिंबा अशा अनेक प्रश्नाकडे विशेष लक्ष घातले. यामूळे त्यांची भारतीय राजकारणातील प्रभावी महिला म्हणून उल्लेख करावासा वाटतो. इंदिरा गांधी राजकरण करतांना राष्ट्रसेवा, जनतेचे कल्याण आणि सार्वभौमत्वाचा प्रकर्षाने विचार केलेला दिसतो हेच त्यांच्या राजकारणाचे गमक होय.

## पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले :

भारताची अर्थव्यवस्था मुठभर भांडवलदारांच्या हातात केंद्रीत झाली होती. देशात भांडवलदार आणि गरीब असे दोन वर्ग निर्माण झाले परिणामी देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी मोरारजी देसाई यांचेकडून अर्थखाते काढून ते आपल्याकडे घेत १४ खाजगी बँकाचे राष्ट्रीयकरण केल्याचा वटहुकूम काढला नंतर सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या आक्षेपाचे निराकरण करणारा कायदा पारित करवून घेतला. सदर निर्णय सामान्य, गरीब लोकांच्या हितासाठी घेतल्याचे त्यांनी सिद्ध करवून दाखवले.

ब्रिटीश काळापासून भारतातील संस्थानिकांना सरकारतर्फे तनखे (वेतन) दिले जात होते. हा पैसा सामान्य लोकांच्या कल्याणासाठी वापरण्याचा हेतू ठेऊन संस्थानिकांशी बोलणी केली पण त्यात यश आले नाही. त्यामुळे राज्यघटनेत आवश्यक बदल करुन २ सप्टेंबर १९७० रोजी लोकसभेत सदर बिल बहुमताने पारित करुन घेतले. पण राज्यसभेत केवळ एका मताने फेटाळल्यामुळे त्याच दिवशी मंत्रीमंडळाची तातडीची बैठक घेऊन राष्ट्रपतीकडून संस्थानिकांचे तनखे बद करण्यासाठी वटहुकूम जारी करुन घेतला. आवश्यक कार्यासाठी त्या विलंब करत नव्हत्या हे उपरोक्त घटनेवरुन सिद्ध होते.

देशांतर्गत राजकारण करतांना आंतरराष्ट्रीय घटना घडामोडीकडे विशेष लक्ष देत असत. १९७१ साली पूर्व पाकिस्तानातील नागरीक स्वतंत्र बांगला निर्मीतीचा लढा तिव्र केला. मात्र पाकिस्तान सरकारने त्यांच्या भावना लक्षात न घेता हा लढा चीरडण्याचा प्रयत्न केला, प्रचंड मानवी अवहेलना केली. याची दखल घेत इंदिरा गांधीनी पाकीस्तानच्या आठमुठ्या धोरणाला खिळ घालण्याचा प्रयत्न केला. विशेषतः बांग्ला प्रदेशातून येणाऱ्या लाखो निर्वासितांना भारतात आश्रय दिला. त्या कारणाने आणि ०३ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानने भारतावर हल्ला केला व भारताने ताकदीनिशी पाकिस्तावर हल्ला करुन त्यांना पराभूत केले. यामूळे भारतात इंदिराजींची प्रतिमा उंचावली, हे करतांना आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील बड्या राष्ट्रांचा पाठिंबाही मिळवला. हे त्यांच्या कार्याचे विशेष योगदान आहे. आता विरोधकही त्यांना 'गुंगी गुडीया' म्हणण्याऐवजी आता 'दुर्गा' या नावाने संबोधले जाऊ लागले. सदर युद्धातील विजय म्हणजे त्यांच्या राजकीय जीवनातील यशाचा सर्वोच्च क्षण होता. म्हणून 'इकॉनामिस्ट' या वृत्तपत्रानेही त्यावेळी त्यांना 'भारताची साम्राज्ञी' असा आदरपूर्वक उल्लेख केला.

युद्धमय वातावरण विरतांनाच १९७२-७३ साली मान्सून भारतात सक्रीय झाला नव्हता. त्यामुळे कोरडा दुष्काळ पडला, शेतीतील पिके आली नाही. परिणामी अन्नधान्याचा तुटवडा पडला. देशात अन्नासाठी आंदोलने होऊ लागली. १९७१ साली बांग्ला निर्वासितांसाठी देशातील अन्नधान्याची कोठारे रिकामी झाली होती. अशा स्थितीतून मार्ग काढण्यासाठी अमेरिकेतून अन्नधान्याची मदत मागीतली व लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण केल्या यावरुन श्रीमती इंदिरा गांधीना विरोधकांना तोंड देत आंतरराष्ट्रीय राजकारणात सक्रियपणे राहिल्या व आवश्यक ती मदत घेऊन देशातील उनिवा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला यावरुन त्यांचे राजकारण वास्तववादी स्वरुपाचे होते असे म्हणावे लागेल.

भारतात लोकसंख्या वेगाने वाढत आहे. यामूळे अनेक प्रश्न उद्‌भवून देशात अस्थिरता निर्माण होईल म्हणून लोकसंख्या नियंत्रणासाठी नसबंदीसारखा कार्यक्रम राबवला या मागील हेतू असा की, लोकसंख्या नियंत्रीत ठेऊन समृद्ध भारत उभारण्याचा होता. त्या काळाच्या दिशेने चालणाऱ्या नेत्या होत्या. हे प्रभावीपणे कार्य करतांना त्यांच्या समोर अनेक संकटे आली, आरोपही झाले.

भ्रष्टाराच्या मुद्यावरुन आरोप प्रत्यारोप होताना नगरवाला प्रकरण तापले त्यामुळे पक्षांतर्गत हेवेदावे वाढत होते, मारुती मोटार प्रकल्प प्रकरणामुळे संसदेत इंदिराजीवर प्रचंड आरोप झाले. इंदिरा सरकार आणि न्यायसंस्था यांच्यातील मतभेद पुढे आले. घटनेतील मूलभूत हक्कात दुरुस्ती करण्याचा हक्क संसदेला आहे का नाही या प्रश्नावरुन सरकार व न्यायसंस्था यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला. तसेच १९७१ च्या निवडणूकीत लोकसभेच्या रायबरेली मतदारसंघात परभूत झालेले विरोधी पक्षनेते राजनारायण यांनी इंदिराजींची निवड अवैध ठरविण्यासाठी याचीका अलहाबाद उच्च न्यायालयात दाखल केली यामूळे इंदिराजींना बराच सामना करावा लागला. जयप्रकाश नारायण यांनी इंदिरा गांधीच्या धोरण व कार्यक्रम विरोधात बिहारमध्ये मोठे जन आंदोलन उभे करुन समग्र क्रांतीचा नारा दिला. अन्नधान्याची टंचाई, वाढती महागाई, भ्रष्टाचारांच्या बातम्यांनी संतप्त झालेले तरुण पेटून उठत इंदिरा गांधी लोकशाहीचा खून करत आहेत. त्या हुकूमशहा बनल्या आहेत या आरोपांमुळे इंदिराजी मोठ्या संकटातून वाटचाल करत होत्या.

एकंदरीत इंदिरा गांधी ह्या हुकूमशाही, एकसत्ताक दिशेने वाटचाल करणारी महिला पंतप्रधान म्हणून म्हटले गेले तरी त्यांचे राजकारण वास्तववादी स्वरुपाचे होते, आदर्शवाद, अंधश्रद्धा या बाबीवर त्यांचा विश्वास नव्हता. आपल्या देशातील नागरीकांच्या गरजा पूर्ण करत देशाचे सार्वभौमत्व टिकवून भारताला भक्कम पायावर उभे करण्याचे आव्हान त्यांच्या समोर होते. यासाठी १८ मे १९७४ रोजी पोखरण येथे अनुस्फोट घडवून आणले भारत अनुशक्तीचे ज्ञान असलेले राष्ट्र ६ व्या क्रमांकाचे ठरले. याचे योगदान इंदिरा गांधीना जाते.

काही निर्ण परीस्थितीनुरुप घेताना घाई व तात्काळतेचे ठरले. ज्यात आर्थिक व सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी २० कलमी कार्यक्रम राबवला. गरीबी हटाओची मोहीम आखली अशा निर्णयाने त्या भारतीय समाज मनावर पक्क्या रुजल्या होत्या. त्यांच्या राजकारणाला वास्तववादी व कार्यतत्परतेची जोड होती. म्हणूनच त्या देश विदेश पातळीवर नावलौकीकास पात्र ठरल्या त्यांना मार्गारेट थॅचर (इंग्लंड) गोल्डा मायर (इस्त्रायल) सिरिमाओ भंडारनायके(श्रीलंका) अशा अनेक आंतरराष्ट्रीय किर्तीच्या महिला नेतृत्वात समावेश करावा लागेल. त्या अत्यंत धाडशी असल्याने त्यांचा उल्लेख अनेकदा 'मंत्रीमंडळातल्या एकमेव पुरुष नेता' असाही केला जात असे. हे त्यांच्या कार्यावरुन सिद्ध झाले आणि भारतातील राजकारणात सक्रीय महिला म्हणून जगानेही त्यांची दखल घेतली आहे.

**सारांश :**

भारतीय राजकारणात महिलांना फारसा वाव नसतांना वडिल पंडित नेहरुंच्या छायेखाली राजकारणाचे धडे गिरवत त्या संकटग्रस्त स्थितीत देशाचे नेतृत्व स्विकारल्या एक महिला असल्याची उनिवही त्या भारतीय राजकारणात भासू दिली नाही. प्रारंभी कमी बोलून निरीक्षण अधिक करण्याच्या वृत्तीतून त्या वास्तववादी राजकारणाकडे झुकल्या. त्यांना आलेला अनुभव, विरोधकांना दिलेली वेळोवेळी उत्तरे यातून त्यांचे व्यक्तीमत्व अधिक प्रगल्भ व खंबीर होत गेले. त्यांनी देशाचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, शत्रुराष्ट्रावरील मात, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे पत वाढवणे, मित्र राष्ट्रांशी केलेला योग्य संवाद, अण्विक क्षेत्रातील भरीव काम या त्यांच्या नेतृदिपक कामगीरीमुळे त्या मुत्सदी व व्यवहारवादी राजकारण करणाऱ्या महिला पंतप्रधान ठरल्या असेच म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

1. M.H. Syed, Indira Gandhi, Himalay Books Pvt.Ltd., Mumbai-२०१०.
2. बलराम नंदा, नेहरु मोतीलाल जवाहरलाल, श्रीविद्या प्रकाशान, १९६१.
3. डॉ. शांता कौठेकर, आधूनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००८.
4. डॉ. विश्वास मेहेंदळे, आपले पंतप्रधान, अनुबंध प्रकाशन, पुणे-२००८.
5. डॉ. श्री.प. कुलकर्णी व डॉ. शुभा साठे, भारतीय राजकारण दशा आणि दिशा, विजय प्रका. नागपूर, २००५.
6. इंदूमती यार्दी, भारतरत्न, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,२०११.